| | |
|---|---|
| MHBI060006432026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र ६४/२०२६ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश**<br>**दिपक वि. अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे, अंबाजोगाई** |

अर्जदार दिपक दिलीप सिसोदिया यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४९७ अन्वये दाखल केला आहे. अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे, येथील गु.र.क्र. ४४१/२०२५ मध्ये पोलीसांनी जप्त केलेला मुददेमाल ज्याचे वर्णन – होंडा मोटारसायकल जिचा रजिस्ट्रेशन नंबर – एमपी/३९/झेडजी/७१६० व चेसीस नं. ME4JC94EMRG017255 व इंजिन नंबर JC94EG3028082 या मुददेमालाचा ताबा अर्जदार यांनी मागितला आहे.

२. अर्ज व अर्जास उत्तरादाखल सादर केलेले म्हणणे वाचले. कागदपत्रंचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, वरील नमुद मुददेमाल अर्जदार यांच्या मालकीचा आहे. सदर मुददेमाल पोलीसांनी तपासादरम्यान जप्त केला असुन सदरचा मुददेमाल पोलीस स्टेशनला पडून आहे. सदरचा मुददेमाल अर्जदार यांचा नियमीत वापरातील मुददेमाल आहे. तो मुददेमाल तसाच पडुन राहील्यास खबरा होवू शकतो व अर्जदार यांना मुददेमाल वापरता येणार नाही. सदर खटल्याचा निकाल लागेपर्यंत मुददेमालाचा अंतरिम ताबा मिळण्यासाठी अर्जदार यांनी विनंती केली आहे. तपासिक अंमलदार यांनी अर्ज फेटाळण्यात करावा अशी विनंती केली आहे व सहाय्यक सरकारी वकील यांनी सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जासोबत अर्जदार यांचे आधार कार्ड याची साक्षांकीत प्रत, वाहन चालवण्याचा परवाना याची साक्षांकीत प्रत, मुददेमाल वाहनाचे नोंदणीचा तपशीलाची साक्षांकीत प्रत, वाहनाचे इन्शुरन्स अशी कागदपत्रे सादर केली आहेत. त्यावरुन असे दिसुन येते की, सदर मुददेमाल वाहनाचे प्रमाणपत्रावर मालकाचे नाव म्हणुन दिपक दिलीप सिसोदिया असे नमुद आहे. अर्जदार यांच्याव्यतिरिक्त इतर कोणीही सदर मुददेमाल परत मागीतलेला नाही. यावरुन सदरचा मुददेमाल अर्जदार यांच्या मालकीचा असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. दाखल गुन्हयाच्या कामी योग्य तो तपास होवुन अंतिम दोषारोपपत्र दाखल होण्यास व खटल्याचे कामकाज चालण्यास पुरेसा अवधी लागणार आहे. अशा परिस्थीतीत मुददेमालाचा अंतरिम ताबा अर्जदार यांना देणे योग्य होणार आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांनी रक्कम रु. ८०,०००/– चे बंधपत्र लिहून दिल्यानंतर, अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे येथील गु.र.नं. ४४१/२०२५ मध्ये पोलीसांनी जप्त केलेला मुददेमाल ज्याचे वर्णन होंडा कंपनीची मोटारसायकल जिचा रजिस्ट्रेशन नंबर– एमपी/३९/झेडजी/७१६० व चेसीस नं. ME4JC94EMRG017255 व इंजिन नंबर JC94EG3028082 हया मुददेमालाचा अंतरीम ताबा अर्जदार यांना खालील अटीं शर्तीवर देण्यात यावा.

अ. अर्जदार यांनी खटल्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत मुददेमालाची विक्री,

गहाणपत्र तारणपत्र करु नये अथवा त्यावर कोणत्याही प्रकारे बोजा निर्माण करु नये, तसेच मुददेमालाचे स्वरुप बदलू नये.

**ब.** न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे खटल्याच्या सुनावणीदरम्यान ज्यावेळी आवश्यक असेल, त्यावेळी मुददेमाल अर्जदाराने न्यायालयात हजर करावा.

**३.** तपासी अंमलदार यांनी अर्जदार यांना मुददेमाल हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर मुददेमालाचे अर्जदाराच्या खर्चाने छायाचित्र काढून मुददेमालाच्या स्थितीबाबत योग्य तो पंचनामा करावा.

**४.** तपासी अंमलदार यांनी मुददेमालाचा तयार केलेला पंचनामा गु.र.नं. ४४१/२०२५ चे अंतीम अहवालासोबत न्यायालयात दाखल करावा.

**५.** पोलीस निरीक्षक, अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे, अंबाजोगाई यांना सदर आदेशाबाबत पत्र पाठविण्यात यावे.

Digitally signed by PRIYANKA JAYAPRAKASH LIGADE
Date: 2026.04.16 17:57:48 +0545

स्थळ – अंबाजोगाई (पी.जे.लिगाडे )

दिनांक १६.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.२)

अंबाजोगाई

**<u>प्रमाणपत्र</u>**

<u>मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.</u>

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखक ग्रेड–३** | : | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | : | **३रे** सह दिवाणी न्यायालय क.स्तर, अंबाजोगाई |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | **१६–०४–२०२६** |

–

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | **१६–०४–२०२६** |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | **१६–०४–२०२६** |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANGANE ANKUSH SADASHIV
Date: 2026.04.16 17:59:27 +0545

**ए.एस.गंगणे**

लघुलेखक ग्रेड–३

३र सह दिवाणी न्यायालय क. स्तर,

अंबाजोगाई